# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जळगाव

# कंत्राटी पध्दतीने विविध पदभरतीसाठी जाहिरात २०१८

## जाहिरात क्रमांक- 1/2018

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जळगाव मार्फत इंटेन्सिव्ह तालुक्यात स्वयंसाहाय्यता समूहाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन, क्षमताबांधणी इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने 11 महिन्याच्या कालावधीकरिता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) व सहाय्यक कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याकरिता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.jalgaondrdaexam.com या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर पदे केवळ मानधनी व कंत्राटी असल्यामुळे कधीच शासकीय सेवेमध्ये कायम करण्यात येणार नाहीत.

www.fjs.co.in

**संवर्ग निहाय रिक्त पदांची संख्या :-** प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) -58, लेखापाल (Accountant)-1, प्रशासन सहाय्यक (Admin Assistant)-1, प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Assistant)-15, डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator)-16, शिपाई (Peon)-16.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 27/09/2018 रोजी<br>दुपारी 12.00 पासून | दिनांक 11/10/2018<br>सायंकाळी 05.30 पर्यंत. |

**बँकेत रोखीने किंवा ऑनलाईन पध्दतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक 13/10/2018.**

कंत्राटी पध्दतीने भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.jalgaondrdaexam.com व www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरून विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

www.fjs.co.in

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे,पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे तसेच शैक्षणिक व अनुभव निकषात बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. तथा जिल्हा अभियान संचालक, जळगाव यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

सही/-

**जिल्हा अभियान संचालक**

**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा जळगाव**